डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परिपत्रक/ अभ्यासक्रम विभाग/ २०२०.

विषयः दि. ०१.०४.२०२० ते दि.१४.०४.२०२० पर्यंत अंतरिम उन्हाळी सुट्टी (Interim SummerVaction) बाबत...

संदर्भः- 1. Ref. No. SU/ Acad. Calendar/ 2019/ 23517-24016 Date: 20.04.2019.
२. आस्था/ आरओ/ २०२०/ ९३६० दिनांकः ३०.०३.२०२०.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या विभाग प्रमुख/ संचालक तसेच शिक्षकांना आणि सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या शिक्षक व सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, देशामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रार्दुभाव व त्या अनुषंगाने होणारे संक्रमण लक्षात घेता शासनाने दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत लॉकडाऊन ***(Lockdown)*** घोषित केले होते व त्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रकांद्वारे सर्व संबंधीतांना कळविले देखिल होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून आता शासनाने दिनांक १४ एप्रिल, २०२० पर्यंत लॉकडाऊन ***(Lockdown)*** घोषित केले आहे. तद्अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने संचालक विद्यापीठ उपपरिसर, सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व शिक्षक / प्राचार्य मॉडेल कॉलेज, घनसांवगी व सर्व संबंधीत संलग्नीत महाविद्यालये यांना सूचित करण्यात येते की, मा. कुलगुरु महोदय यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२ (७) व (८) अन्वये त्यांना असलेल्या विशेष अधिकारात दिनांक ०१.०४.२०२० ते १४.०४.२०२० हा काळ विद्यापीठाने अंतरिम उन्हाळी सुट्टी म्हणून घोषित केला आहे.

याबाबत असेही कळविण्यात येते की, संदर्भीय क्र. ०१ नुसार शैक्षणिक वेळापत्रकामध्ये नमुद केल्यानुसार दि.०२.०४.२०२० ते दि.१४.०६.२०२० या कालावधीतील उन्हाळी सुट्टीचा कालावधी लक्षात घेता उपरोक्त अंतरीम उन्हाळी सुट्टीच्या कालावधी दरम्यान अथवा तद्नंतर सुट्टीचा कालावधी असला तरी उद्भलेल्या परिस्थतीमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासण्याच्या दुष्टीने सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या परिक्षा तथा इतर अनुषंगीक कामकाजासाठी विद्यापीठास गरज भासल्यास आपल्या सेवा प्रदान कराव्यात.

अंतरिम उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये विद्यापीठातील संचालक विद्यापीठ उपपरिसर, सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व शिक्षक / प्राचार्य मॉडेल कॉलेज, घनसांवगी व सर्व संबंधीत संलग्नीत महाविद्यालये तसेच संबंधीत अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी घरी राहून ***(Work from Home)*** कार्य करतील. तथापि आवश्यकतेनुसार त्यांनी आपल्या सेवा बहाल करणे अपेक्षित आहे.

या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार सर्व संबंधीताना कळविण्यात येईल.

कृपया, सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद-४३१००४.
संदर्भ क्र. शैक्ष. विभाग/अभ्यासक्रम/ २०२०/9395

दिनांक :- ०१-०४-२०२०.

कुलसचिव
1-4-2020

****